रविवार, दि. २७ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## पन्नास खोके ओके म्हणणारेच आता भाजपमध्ये?

### नैतिकतेचा खेळ की राजकीय गणित?

**दीपक शेळके**

**जालना -** शिवसेनेच्या फुटीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पन्नास खोके, एकदम ओके हे वाक्य वादळासारखं गाजलं. हे वाक्य उच्चारलं होतं काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी. त्यांनी तेव्हा भाजप आणि एकनाथ शिंदे गटावर सडकून टीका केली होती.

पण आज परिस्थिती वेगळी आहे. गोरंट्याल यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे यांची अलीकडेच भेट घेतली होती. आता माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांची भेट घेत बंद दाराआड अर्धातास चर्चा केली. त्यामुळे आता गोरंट्याल यांच्या भाजपा प्रवेशाचे केवळ औपचारिकता बाकी राहिली आहे.

ही घटना अनेक प्रश्न उपस्थित करते. एका बाजूला भाजपकडून काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेतील नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप, टीका आणि आंदोलने केली जातात. पण काही महिन्यांनी हेच नेते भाजपमध्ये सामील झाले की सारे आरोप कुठे गायब होतात.

गोरंट्याल हे त्याच राजकारणाचे एक उदाहरण ठरत आहेत. त्यांनी ज्यांच्यावर खोके घेतल्याचा आरोप केला होता, त्याच गटाशी आता जवळीक साधण्याच्या हालचाली सुरू असल्याचे दिसते. मग सामान्य मतदार काय समजून घ्यायचं? राजकारणात नैतिकता, विचारधारा, टीकेचा खरा हेतू याला काही किंमत आहे का?

भाजपने कोणत्याही नेत्याला पक्षात घेताना त्याच्या विरोधात केलेल्या आरोपांचं स्पष्टीकरण द्यावं का नाही? आणि जे नेते पूर्वी भाजपला भ्रष्टाचारी म्हणत होते, ते आता त्या पक्षात सामील होऊन कोणती सुधारणा करणार आहेत?

यामध्ये सर्वसामान्य मतदार मात्र गोंधळलेला आहे. पक्ष कोणताही असो, सत्ता मिळवण्यासाठी विचारधारा बदलणं, एकमेकांवर काल आरोप करणारे नेते आज एकत्र बसताना पाहणं - ही परिस्थिती लोकशाहीचा अपमान ठरत आहे.

माजी आमदार कैलास गोरंट्याल हे भाजपात प्रवेश करणार यावर आता जवळपास शिक्कामोर्तब होणे बाकी आहे. त्यांच्या पक्ष बदलामुळे काँग्रेसमध्ये मात्र अस्वस्थता पसरली आहे. जालन्यातील काँग्रेसजन नाराज झाले आहे. अनेकांच्या मते माजी आमदार गोरंट्याल यांनी काँग्रेसमध्ये राहावे अशी विचारधारा आहे तर काही माजी नगरसेवकच भाजपात जाणार असल्यामुळे कैलास गोरंट्याल यांनाही नाईलाजास्तव या निर्णयास्तव यावे लागले अशी चर्चा होत आहे. कैलास गोरंट्याल यांनी पुनर्विचार करावा असा एक गट काँग्रेसमध्ये आहे.

#### भाजपमध्ये प्रवेश की राजकीय मजबुरी?

सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेसमधील अंतर्गत वाद, काही माजी नगरसेवकांची भाजपप्रवेशाची तयारी आणि जिल्हास्तरीय नेतृत्वातील गोंधळ यामुळे गोरंट्याल यांच्यावर भाजपप्रवेशाचा दबाव वाढलेला आहे. काँग्रेसमध्ये राहून राजकीय भवितव्य अंधुक असल्याची भावना त्यांच्या समर्थकांमध्ये व्यक्त होत आहे.

#### काँग्रेसमध्ये नाराजी व अस्वस्थता

गोरंट्याल यांच्या संभाव्य पक्ष बदलामुळे जालना काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण आहे. काही जणांनी गोरंट्याल यांनी पक्ष न सोडता पक्ष मजबूत करावा अशी भूमिका घेतली असून, काँग्रेसमधील नव्या नेतृत्वाची मागणीही जोर धरत आहे.

**‘जेव्हा पक्ष बदलतो, तेव्हा सत्यही बदलतं का?’**

**काँग्रेसमधील पडझड; नेतृत्वशून्यता की अंतर्गत असंतोष?**

**नैतिकता, विचारधारा यांचं राजकारणात काय स्थान?**

**सत्तेसाठी विचारधारेचा त्याग ही आता सामान्य बाब!**

**मतदार गोंधळलेला; ‘स्मरणशक्ती’ गमावलेला नाही!**

युवा आदर्श

### अनंत शंकर ...

नत मस्तक त्यासमोर
भूत पिशाच्च भयंकर
भयस्पर्श न करे कधी
स्मशानी राही शंकर
भक्ती पोटी रावणाला
शिवलिंग दे गिरीश्वर
तितका स्नेह रामावर
भेद ना मानी सर्वेश्वर
शांत भोळा सदाशिव
ना चिडे कधी महेश्वर
राख करी विरूपाक्ष
शक्ती शाली जटाधर
आर्यापति वैभवशाली
त्रिजग स्वामी अनीश्वर
वैराग्य मूर्ती निरंकारी
निर्मोही असा दिगंबर
विविध रुपे महांकाली
मनोहर तो चंद्र शेखर
मोक्षदाता तो मृत्युंजय
मोक्ष दान दे मेल्यावर
जगातून या गेल्यावर
राख होणार हे कलेवर
राख आम्हा तुज पायी
कैलास पति परमेश्वर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.


# कैलाश गोरंट्याल यांचा भाजप प्रवेश ही राजकीय आत्महत्या

## जालन्यात गोरंट्याल यांचे अल्पसंख्याकामुळे राजकीय अस्तित्व !

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे निराश झालेले माजी आमदार कैलाश गोरंट्याल यांनी त्यांच्या पराभवाचे खापर कधी पक्षावर, कधी पक्ष नेतृत्वावर, कधी मुस्लिम मतदारांवर तर कधी मुस्लिम प्रतिस्पर्धी उमेदवारावर फोडले आहे. परंतु त्यांनी आत्मपरीक्षण केले नसल्याचे दिसून येते. माजी आमदार कैलाश गोरंट्याल हे गेल्या चाळीस वर्षांपासून काँग्रेसच्या माध्यमातून जालना जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय आहेत. तर त्यांचे काका व्यंकटेश गोरंट्याल हे नगरपालिकेचे भाजपा सदस्य होते आणि पूर्वी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख सदस्यांपैकी एक मानले जात होते. परंतु कैलाश गोरंट्याल यांनी युवक काँग्रेस आणि काँग्रेसचा हात धरून राजकारणात प्रवेश केला. जिल्ह्याच्या राजकारणात सहिष्णु राजकारणी म्हणून त्यांची ओळख होती आणि गेल्या चाळीस वर्षांच्या त्यांच्या राजकीय आयुष्यात त्यांनी सर्व धर्म, समुदाय, समाज आणि वर्गांना एकत्र आणले. ते पुढे नेले गेले आहे आणि यामुळेच जालना नगरपरिषद सदस्य, नगराध्यक्षपदाची पदे भूषवली आणि १९९९ मध्ये तत्कालीन कॅबिनेट मंत्री आणि शिवसेनेचे उमेदवार अर्जुन खोतकर यांचा पराभव करून त्यांनी संपूर्ण राज्यात स्वतःचे नाव कमावले. २००४ मध्ये त्यांना पुन्हा अर्जुन खोतकर यांच्याविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. परंतु २००९ मध्ये कैलाश गोरंट्याल यांनी पुन्हा जालना विधानसभा मतदारसंघात विजय मिळवला. २०१४ मध्ये मुस्लिम मतांच्या विभाजनामुळे कैलाश गोरंट्याल यांचा पुन्हा पराभव झाला. पण २०१९ मध्ये त्याच मुस्लिम मतदारांच्या पाठिंब्यामुळे कैलाश गोरंट्याल यांना ऐतिहासिक विजय मिळाला. आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मुस्लिम मतांच्या विभाजनामुळे कैलाश गोरंट्याल यांना पुन्हा पराभवाचा सामना करावा लागला. पण यावेळी पराभवातून शिकण्याऐवजी कैलाश गोरंट्याल यांनी त्यांच्या पराभवाचे खापर कधी पक्षावर, कधी पक्ष नेतृत्वावर, कधी मुस्लिम मतदारांवर तर कधी मुस्लिम प्रतिस्पर्धी उमेदवारावर फोडले आहे . आज असे म्हटले जात आहे की धर्मनिरपेक्ष प्रतिमा असलेले कैलाश गोरंट्याल भाजपमध्ये सामील होण्यास उत्सुक आहेत आणि भाजपमध्ये सामील होण्यासाठी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अशोक चव्हाण, राज्यमंत्री राधाकृष्णन विखे पाटील, औरंगाबादचे मंत्री अतुल सावे आणि माजी खासदार आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, यांच्याशी भेटीगाठींचा सिलसिला सुरू केला आहे. काल, कैलाश गोरंट्याल यांचा एक व्हिडिओ सोशल मीडिया आणि यूट्यूब चॅनेलवर व्हायरल झाला. ज्यामध्ये त्यांनी कवितेतून पक्षाबद्दलचा आपला असंतोष व्यक्त केला आणि म्हटले होते की,

**आईना बनने का हरजाना भरना है मुझे**
**कब का टुट चुका था अब बिखरना है मुझे**
**मुझे बता ऐ सादा दिली**
**ये ईमतेहान कब तक देना है मुझे**

त्यांनी आतापर्यंत स्पष्ट आणि अस्पष्ट शब्दात भाजपमध्ये सामील होण्याचा आपला हेतू व्यक्त केलेला नाही. परंतु त्यांच्या शेरोशायरीच्या शैलीवरून अंदाज लावता येतो की ते आता भाजपमध्ये सामील होण्याचा विचार करत आहेत.





**लियाक़त अली खान यासिर जालनवी**
**मो. ९४२२७२४२५७**

गेल्या चाळीस वर्षांच्या त्यांच्या राजकीय प्रवासाकडे आपण मागे वळून पाहिले तर हे स्पष्ट होते की कैलाश गोरंट्याल यांनी जालना विधानसभा मतदारसघात संपूर्ण राज्यात काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून एक धर्मनिरपेक्ष राजकारणी आणि राष्ट्रीय एकता, धार्मिक सहिष्णुतेचे रक्षक आणि सामाजिक समनतेचे समर्थक म्हणून आपली ओळख निर्माण केली होती. जालना विधानसभा मतदारसंघातील सर्व धर्म, समाज, वर्ग आणि समुदायांनी त्यांना पाठिंबा दिला. विशेषतः मुस्लिम समुदायाने नेहमीच कैलाश गोरंट्याल यांच्या राजकीय विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. खरं तर, कैलाश गोरंट्याल यांचे राजकीय अस्तित्व जालना विधानसभा मतदारसंघातील मुस्लिमांचे ऋणी आहे. नगरपालिका निवडणुका असोत किंवा विधानसभा निवडणुका असोत काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून कैलाश गोरंट्याल यांनी मुस्लिम अल्पसंख्याक आणि इतर अल्पसंख्याक, ओबीसी आणि इतर मागासवर्गीयांकडून मोठ्या प्रमाणात मते मिळवली आणि त्यांना जिंकण्यास मदत केली. आता कैलाश गोरंट्याल भाजपमध्ये गेले तर ते त्यांच्यासाठी आणि त्यांच्या **पान २ वर**

# संपादकीय

## थायलंड-कंबोडिया युध्द दक्षिण-पूर्व आशियासाठी घातक!

थायलंड-कंबोडिया सीमा विवाद अचानक २३ जुलै २०२५ ला भयानक मोडवर पोहोचला सीमेवर तैनात एक थाई सैनिक विस्फोटमध्ये घायल झाला हा विस्फोट अशा ठिकाणी झाला की ज्या ठिकाणी मे महिन्यापासुन दोन्ही देशांची सेना आमने-सामने सीमावर्ती भागात तैनात होती.या विस्फोटचा आरोप थायलंडने कंबोडिया वर लावला.यानंतर २४ जुलै २०२५ ला थायलंड सेना अधिकाऱ्यांनी दावा केला की कंबोडिया सेनाने थायलंडच्या ४ सीमावर्ती प्रांतावर ( सुरिन,सिसाकेत,बुरीराम आणि उदोन थानी) रॉकेटने हल्ला केला यामध्ये ११ थायलंड नागरिक आणि एक सैनिक मारल्या गेला.यानंतर प्रत्युत्तर दाखल थायलंड वायुसेनाने एफ-१६ लडाकु विमानाने कंबोडियावर हल्ले केले आणि हा संघर्ष विकोपाला जाऊन पोहोचला व युध्दात परिवर्तीत झाला.११०० वर्षे जुने मंदिर विवादाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले जाते आणि याला कारणीभूत फ्रान्स असल्याचे जगजाहीर आहे.कारण थायलंड,कंबोडिया आणि लाओसच्या सीमेला एमराल्ड ट्रायंगल म्हटल्या जाते.१९०४ ला फ्रांसीसी औपनिवेशिक प्रशासनाने फ्रेंको-सियामी संधीच्या अंतर्गत सीमा मार्कींगसाठी डांगरेक पर्वत ला मुख्य आधार बनविण्यात आला.१९०७ मध्ये जेव्हा फ्रांसीसी सर्वेक्षण अधिकाऱ्यांनी नकाशा तयार केला तेव्हा प्रीह विहार मंदिर कंबोडियामध्ये दाखविण्यात आले.परंतु थायलंडने अनेक मंदिराच्या बाबतीत शंका व्यक्त केली आणि तेथूनच सीमा संघर्षाला सुरुवात झाली व हा संघर्ष फ्रान्सच्या १२१ वर्ष जुन्या चुकीमुळे निर्माण झालेला संघर्ष आज युध्दात रूपांतरीत झाल्याचे दिसून येते. गेल्या ११०० वर्षांपासून थायलंड व कंबोडियात जुन्या प्रेह विहेयर मंदिरावरून वाद सुरू आहे.हेगमधील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने १९६२ मध्ये हे मंदिर कंबोडियामध्ये असल्याचा निकाल दिला आणि थायलंडने निकाल सुध्दा मान्य केला.परंतु आताही आजुबाजुच्या जमिनींवरील वाद सुरू आहे आणि हा संघर्ष दिनांक २४ जुलै २०२५ ला दोन्ही देशांसाठी आगीचा गोळा बनली व हा वाद येवढा विकोपाला गेला की दोन्ही देश भिषण युध्दाच्या छायेत वावरत आहेत ही बाब संपूर्ण आशिया खंडासाठी चिंतेची व गंभीर विषय आहे.थायलंड व कंबोडिया यांना युद्धासाठी उकसविण्याचे काम चीन करीत आहे आणि समझोता करण्याचे काम करीत आहे.म्हणजे आग लावणे आणि विझविने हा चीनचा स्वार्थीपणाचा गुणधर्म आहे. कारण त्याचा मुख्य उद्देश म्हणजे विस्तारवादाला चालना देणे.त्यामुळे चीन दिवसेंदिवस आशिया खंडासाठी घातक सिद्ध होत आहे. कारण थायलंड-कंबोडिया यांच्यात जमीन विविद ११०० वर्षांपासूनचा आहे.परंतु आतापर्यंत येवढी भयानक युद्धजन्य परिस्थिती अजून पर्यंत निर्माण झालेली नव्हती.परंतु आता दोन्ही देशांकडून अत्याधुनिक शस्त्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे यात बीएम-२१ रॉकेट,एफ-१६ विमानांनी सैन्य ठिकाणांवर हल्ले आणि एफ-१६ विमानांची थायलंडची तयारी हा अत्यंत गंभीर विषय आहे.दोन्ही देशांचा वाढता संघर्ष पहाता दोन्ही देशांनी एकमेकांच्या राजदूतांची हकालपट्टी सुध्दा केली आहे. कंबोडियाने थायलंडवर बीएम -२१ रॉकेटने कारवाई केली तर थायलंडने एफ-१६ ने प्रत्युत्तर दिले व खुनी संघर्ष सुरू झाला.या संघर्षाचे मुख्य कारण म्हणजे डंगरेक पहाडावर स्थापित ११०० वर्षे जुने शिव मंदिर आहे (प्रासात तामुएन थोम)या मंदिरावर दोन्ही देश आपला हक्क सांगतात. मंदिर भलेही थायलंडच्या सध्याच्या नकाशामध्ये येते, परंतु कंबोडिया या मंदिराला आपली पृष्ठभुमि मानते. त्यामुळे हा संघर्ष वाढता-वाढता आता युद्धामध्ये परिवर्तीत झाला आहे याचा गंभीर परिणाम थायलंड-कंबोडियाला तर भोगावाच लागेल सोबतच याचे प्रायश्चित्त संपूर्ण आशिया खंडातील देशांना सुध्दा भोगावे लागेल. त्यामुळे यावर ताबडतोब तोडगा निघणे गरजेचे आहे.असे सांगितले जाते की ११०० वर्षे जुने शिव मंदिर ज्याला प्रेह विहेयरच्या नावाने ओळखले जाते हे मंदिर खमेर सम्राट सूर्यवर्मन यांनी भगवान शिव साठी बनविले होते.परंतु वेळेनुसार हे मंदिर आता फक्त आस्थेचे केंद्र नसून राष्ट्रवाद, राजनीती आणि सैन्य ताकदीचा आखाडा बनला आहे.त्यामुळेच कंबोडिया आणि थायलंड यांचा संघर्ष विकोपाला गेला असुन झगड्याचे मोठे कारण बनले आहे. थायलंड-कंबोडिया वाढता संघर्ष पहाता सीमावर्ती भागातील थायलंडमधील एक लाखाहुन अधिक लोक आपले घर सोडण्यास मजबूर झाले आहेत.दिनांक २६ जुलैला सीमावाद आणि शिवमंदिर वादांमुळे आणखी भयावह स्थिती दिसून आली दोन्ही बाजूंनी प्रतीहल्ले सुरूच आहे यात ३६ लोक मारल्या गेले व ९० नागरिक जखमी झाले.आतापर्यंत दोन्ही देशांच्या विवादात ७८ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीररीत्या जखमी आहेत. दोन्ही देशाची युध्द परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने आपातकाल बैठक घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरू केली आहे.परंतु यात अमेरिका व चीनची मध्यस्थी थायलंड व कंबोडियाने नाकारली आहे.त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघानेच हा संघर्ष स्वतः मध्यस्थी करून ताबडतोब थांबवावा व दक्षिण-पूर्व आशिया खंडात शांतता प्रस्थापित करावी.कारण जगात अनेक भागात युद्धजन्य परिस्थिती व गृहयुद्ध सुरू आहे त्यात जर दक्षिण-पूर्व आशियामध्ये युध्दाची चिंगारी वाढली तर संपूर्ण आशिया खंडात मोठा भडका उडुन भयावह स्थिती निर्माण होऊ शकते त्यामुळे याचे निवारण संयुक्त राष्ट्रसंघाने करावे..

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्यच

भटक्या कुत्र्यांचा भयावह घटना पहाता याचिकाकर्त्यांला सर्वोच्च न्यायालयाने सुनावलेले उत्तर स्वागतार्ह आहे. मानवाच्या रक्षणार्थ भटक्या कुत्र्यांना रस्त्यावर खाऊ घालने अयोग्यच आहे. ज्यांना भटक्या कुत्र्यांची दया येत असेल त्यांनी आपल्या घरात खाऊ घालावे याचे स्वागत सर्वच स्तरातून केल्या जाईल.दया हे मानवीयदृष्टया महान कार्य आहे.परंतु यापोटी भटक्या श्वानांना खाऊ घालण्यावरून एखाद्याचा स्थानिक लोक छळ करीत असतील तर? नेमक्या अशा एका प्रकरणात छळापोटी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणाऱ्या याचिकाकर्त्यांला सर्वोच्च न्यायालयाने चांगलेच फटकारले व म्हणाले अशा श्वानांना रस्त्यावर खाऊ घालण्यापेक्षा तुम्ही तुमच्या घरी का खाऊ घालत नाहीत?असा सवाल न्यायालयाने केला.नोएडातील एका याचिकाकर्त्याच्या सुनावणीमध्ये लावारीस कुत्र्यांच्या बाबतीत याचिकाकर्त्यांच्या वकिलाने म्हटले की प्राण्यांना खाऊ घालण्याच्या कामी आमच्या याचिकाकर्त्यांला त्रास होत आहे आम्ही पशु नियंत्रण नियमांतर्गत काम करीत असुनही आम्हाला का त्रास दिला जात आहे?यावर न्यायालयाने म्हटले की, आम्ही किती रस्ते आणि गल्ल्या पशुप्रेमीसाठी सोडायच्या? प्रत्येक ठिकाणी प्राण्यांसाठी जागा आहे.माणसांसाठी नाही.तुमच्या सारख्या ज्या लोकांना प्राण्यांचा पुळका असेल त्यांनी आपल्या घरात प्राण्यांसाठी निवासगृह सुरू करावे.सर्वच भटक्या कुत्र्यांना तुम्ही तीथेच खाऊ घाला.तुम्हाला हे करण्यापासून कोणी थांबवणार नाही.देशात भटक्या कुत्र्यांच्या अनेक हुदयात व अंगावर शहारे येणाऱ्या घटना आपण सोशल मीडियाच्या माध्यमातून व वर्तमानपत्रातुन पाहिल्या किंवा ऐकल्या आहेत. अशा परिस्थितीत भटक्या कुत्र्यांवर लगाम कसने काळाची गरज आहे.परंतु काही प्राणी प्रेमी रस्त्यावरील कुत्र्यांना खाऊ घालतात व याचा विपरीत परिणाम सर्वसामान्याना भोगावा लागतो.कारण कुत्र्यांना त्यांच्या वेळेवर खायला भेटले तर ठीक आहे;जर त्यांना वेळेवर जर खायला मिळाले नाही तर ते उग्र रूप धारण करतात.अशा परिस्थितीत पायदळ चालणारे, दुचाकी वाहन चालविणारे, शाळकरी मुले,सायकलस्वार अशांवर आक्रमन करतात व चावा घेण्याचा प्रयत्न करतात आपण चावा घेण्याच्या भयावह घटना वर्तमानपत्राच्या माध्यमातून किंवा मिडियाच्या माध्यमातून पाहिल्या आहेत.त्यामुळे प्राण्यांची सेवा करने वाईट नाही. प्राण्यांची सेवा केलीच पाहिजे परंतु त्यापासून कोणालाही नुकसान होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे.कारण ते मुके प्राणी आहेत.परंतु त्यांच्यापासून कोणालाही इजा किंवा त्रास होणार नाही हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. देशात तब्बल ६ करोड २० लाख भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. त्यात महाराष्ट्राचा विचार केला तर १२ लाख ७६ हजार भटक्या कुत्र्यांची संख्या आहे.भारतात दरवर्षी कुत्रा चावल्याने २० हजार लोकांचा मृत्यू होतो असे एका अभ्यासात म्हटले आहे.भारतात सध्याच्या परिस्थितीत साप चालण्यापेक्षा कुत्र्याच्या चावण्याने जास्त लोक मरतात. रेबीजमुळे होणारे ३६ टक्के मृत्यू भारतात होतात.यावरून आपण समजू शकतो की कुत्र्यांचा चावा किती भयानक असतो व याचे दुष्परिणाम सर्वांच्याच समोर आहे.प्रशासन कुत्र्यांची नसबंदी कितपत करतात आणि किती सक्सेस होते यावरही प्रश्न चिन्ह उपस्थित होतो. आजही बऱ्याचशा राज्यात भटक्या कुत्र्यांची भयंकर दहशत आहे या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्य आणि जनहितार्थ असल्याचे मी समजतो.त्याचबरोबर रस्त्यावर अनेक पशु रोडवर किंवा रोडच्या कडेला बसून असतात कधीकधी दुर्घटनाग्रस्त सुध्दा होतात यावरही सरकारने व स्थानिक प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करायला पाहिजेत.परंतु रस्त्यावरील कुत्र्यांच्या बाबतीत ज्यांना भावनिक किंवा जास्त काळजी वाटत असेल त्यांनी अशा भटक्या कुत्र्यांची व्यवस्था स्वतः करावी जेणेकरून त्यांचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होणार नाही.मुक्या जनावरांची सेवा करणे हा मानव धर्म आहे परंतु याचे विपरीत परिणाम व सर्वसामान्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती आहे की भटक्या कुत्र्यांच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासनाच्या वतीने यावर योग्य उपाययोजना करावी.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# तरंगणाऱ्या कोया, बिया निरुपयोगी! - विजयकुमार कट्टी



आपण आंब्याच्या कोया आणि इतर फळझाडांच्या बिया लावण्यापूर्वी त्या पाण्यात टाकून बघाव्यात.त्या तरंगल्या तर समजायचे,या कोया आणि बिया निरुपयोगी आहेत. पण जर त्या बुडाल्या तर त्या लावण्यायोग्य हे समजून त्या लावाव्यात असे प्रात्यक्षिकासह मौलिक मार्गदर्शन,वृक्षतज्ञ विजयकुमार कट्टी यांनी नुकतेच केले.नवी मुंबई येथील पर्यावरण तज्ज्ञ सुधीर थोरवे आणि पर्यावरण प्रेमी मंडळीनी रायगड जिल्ह्यातील कर्जत जवळील टेकडीवर आयोजित केलेल्या वृक्षारोपण प्रसंगी श्री कट्टी बोलत होते.

वृक्षारोपण कार्यक्रमाच्या निमित्ताने गेली दोन महिने घरी जमवलेल्या आंब्याच्या कोया, जांभळाच्या ,फणसाच्या, सीताफळाच्या बिया घेऊन मोठ्या हौसेने माध्यमकर्मी देवेंद्र भुजबळ आले होते.या कोया आणि बिया कुठे लावणे योग्य ठरेल ? असे त्यांनी कट्टी यांना विचारले असता,प्रथम त्यांनी वृक्षारोपणासाठी तयार केलेल्या आणि पावसाचे पाणी जमलेल्या एका खड्ड्यात एकेक कोय टाकण्यास सुरुवात केली आणि प्रत्येक कोय बुडत गेली. कोयांची ज्या पद्धतीने काळजी घ्यायला हवी होती ती न घेतली गेल्याने असे झाले आहे, असे सांगून त्यांनी कोयांची, शास्त्रीय पद्धतीने कशी काळजी घ्यावी हे,उपस्थित सर्वांना समजावून सांगितले.सुदैवाने आणलेल्या बिया मात्र बुडाल्याने, त्या सर्व लावण्यात आल्या. या बरोबरच कट्टी यांनी उपस्थित गृहिणींना, त्यांनी स्वयंपाकात शेंगदाणे वापरण्यापूर्वी ते पाण्यात टाकून बघावेत आणि ते बुडाले तरच वापरावेत,अशी अंदर की बात सांगितली!

या प्रसंगी नुकतेच दिवंगत झालेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख यांच्या स्मरणार्थही वृक्षारोपण करण्यात आले.

या वृक्षारोपणासाठी वनाधिकारी समीर खेडकर, जितेंद्र चव्हाण, कर्जत येथील शरद पवार, विलास आचरेकर,आमदार महेंद्र थोरवे यांचे सहायक राजू थोरवे यांचे सहकार्य लाभले.

श्री सुधीर थोरवे आणि त्यांचे सम विचारी गेल्या १२ वर्षांपासून वन विभागाच्या सहकार्याने या टेकडीवर वृक्षारोपण करीत आहेत.

७ जणांपासून सुरू झालेला हा समूह आता ७५ पर्यंत गेला आहे.यावेळच्या ७५ जणांमध्ये सम विचारी स्त्री,पुरुषच नव्हे तर आबाल वृद्ध देखील सहभागी झाल्याने



एक प्रकारच्या कौटुंबिक वातावरणात हे वृक्षारोपण झाले. या अनौपचारिक उपक्रमाला निश्चित स्वरूप यावे म्हणून एका फाउंडेशनची स्थापना करण्याचे यावेळी ठरविण्यात आले.

### वाचकांचे मनोगत

## मराठी द्वेष्ट्यांना भिडल्या महाराष्ट्राच्या लेकी

केंद्र सरकारच्या शैक्षणिक त्रिभाषा धोरणास महाराष्ट्र सरकारने अनुसरून पहिली पासून हिंदी भाषेला स्थान दिले त्यास महाराष्ट्रातून ठाम विरोध झाला त्यामूळे सरकारनेच काढलेले दोन अध्यादेश मागे घेतले.राज - उद्धव ठाकरे बंधुनी कडाडून विरोध केला.महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी ठाकरे बंधूंच्या निर्णयाला सहमती दिली.साधारण वीस हजार हिंदी भाषिक शिक्षकांना महाराष्ट्रात रोजगार उपलब्ध झाला असता.मुंबई- महाराष्ट्रात संपूर्ण देशभरातील सर्व जातीधर्मचि लोक राहतात त्यांना महाराष्ट्राची मातृभाषा मराठी बंधनकारक करायचे सोडून मराठी भाषेलाच दूर लोटण्याचे कारस्थान उघड झाले.त्रिभाषा धोरणात महाराष्ट्रात संस्कृत भाषेचा समावेश करा.महाराष्ट्रातील मराठीच्या मुद्द्यावरून भाजपचे खासदार निशिकांत दुबे थेट महाराष्ट्रातील मराठी नेत्यांना आव्हान देत चिथावणीखोर भाषा बोलू लागले त्यांना महाराष्ट्रात राहणार्या परप्रांतीय लोकांकडून विरोध झाला नाही.' पट पटक के मारेंगे 'निशिकांत दुबेच्या वक्तव्याचा महाराष्ट्राच्या लेकी खासदार वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर आणि शोभा बच्छाव यांनी संसदेत जय महाराष्ट्रच्या घोषणा देत.दुबेला महाराष्ट्राचे पाणी दाखवले. राज्यांचे राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधित्व म्हणून नेमलेले आहेत. दैनंदिन राजकारणापासून अलिप्त राहून राज्याच्या समस्यांकडे निष्पक्षपातीपणे पाहायचे असते.असे सर्वसाधारण संकेत आहेत. महाराष्ट्र विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील आमदार, मंत्री यांच्या गैरवर्तनाबद्दल चकार शब्द बोलले नाहीत. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी या संकेताकडे दुर्लक्ष करीत राजभवनातील एका कार्यक्रमात एका राजकीय नेत्याप्रमाणे मराठी - अमराठी भाषीकवादावर व्यक्त होत राज्यातील भूमिपुत्रांना आरोपीच्या पिंजर्यात उभे केले.निष्पक्षपाती अशा संविधानीक पदावर असलेल्या महामहीमांना शोभादायक ठरत नाही.मराठी माणसा जागा हो,रात्र वैर्याची आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

### भाजपा जालना महानगर जिल्ह्यात मन की बात कार्यक्रम संपन्न

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी** - भारताचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी आज (ता.२७) सकाळी ११ वाजता मन की बात या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा मुख्य कार्यक्रम भाजप जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे हे स्वतः उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी असून, 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे देशहिताचे विचार, सामाजिक जाणीवा आणि नवचेतना निर्माण होते. असे त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेशजी राऊत, मा.जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सतीश जाधव, विमलताई आगलावे, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, अर्जुन गेही, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार,




सिद्धिविनायक मुळे, देविदास देशमुख, राजेश जोशी, गोवर्धन कोल्हे, प्रशांत गाडे, सोमेश काबली, सेवकराम नारियलवाले, बाबुराव भवर, सुदर्शन काळे, गोविंद ढेंबरे, दत्ता जाधव आदीसह प्रमुख उपस्थिती होती.

तसेच सदरील कार्यक्रम भाजपा जालना महानगरातील विविध मंडळात आयोजित करण्यात आला त्यामध्ये नवीन जालना मंडळात मंडळ अध्यक्ष सुनील खरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जुना जालना मंडळात मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळात अमोल धानुरे व जालना ग्रामीण मंडळात तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिला मोर्चा, युवा मोर्चा, व्यापारी आघाडी, अनुसूचित जाती-जमाती मोर्चा, अल्पसंख्याक मोर्चा, इत्यादी आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मन की बात कार्यक्रम ऐकला.

पान १ वरुन

## कैलास गोरंट्याल ...

कुटुंबासाठी राजकीय आत्महत्या ठरेल, हे निश्चित . कारण जालना विधानसभा मतदारसंघ आणि नगरपालिका निवडणुका सारख्याच आहेत. या भागातील सर्व अल्पसंख्याक, ओबीसी, एससी, एसटी आणि इतर मागासवर्गीय, विशेषतः मुस्लिम अल्पसंख्याक, कैलाश गोरंट्याल यांची मुख्य वोट बँक राहिली आहे. आता कैलाश गोरंट्याल भाजपमध्ये सामील झाले तर ही मुख्य वोट बँक त्यांच्या हातून जाईल. आजपर्यंत जालना जिल्हा, विशेषतः जालना शहरात, काँग्रेस म्हणजे कैलाश गोरंट्याल आणि कैलाश गोरंट्याल म्हणजे काँग्रेस असे समीकरण झाले आहे. जिल्हा काँग्रेसची कल्पनाही कैलाश गोरंट्याल शिवाय करता येत नाही. पण आता ते भाजपमध्ये सामील झाले तर त्यांना काँग्रेसमध्ये असलेले भाजपमध्ये ते स्थान आणि दर्जा मिळणार नाही. कारण जालना जिल्ह्यातील भाजपच्या राजकारणाचे केंद्र आणि धुरीण माजी खासदार आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील आहेत. आतापर्यंत असे दिसून आले आहे की जालना जिल्ह्यातील इतर पक्षांचे भाजपमध्ये सामील झालेले सर्व पदाधिकारी त्यांची ओळख गमावून बसले आहेत आणि त्यांना जालना जिल्हा भाजपमध्ये ते स्थान कधीही मिळू शकलेले नाही जे त्यांना त्यांच्या पूर्वीच्या पक्षांमध्ये होते. आज या राजकारण्यांची अवस्था घर के ना घाट के अशी झाली आहे आणि आता भाजपमध्ये सामील झाल्यानंतर कैलाश गोरंट्याल यांचीही अवस्था होणार नाही, याची कोण शाश्वती देणार आहे. अजूनही महानगरपालिका निवडणुका होण्याची शक्यता आहे, परंतु भाजप कदाचित या निवडणुकांमध्येही कैलाश गोरंट्याल यांना बाजूला ठेवेल. आता कैलाश गोरंट्याल यांनी ही राजकीय आत्महत्या कशी टाळायची याचा परिपूर्ण विचार करावा, अशी सामान्य मतदारांची अपेक्षा आहे.

# पाणीवेस ते राजमहल मार्गावरील पोल तातडीने काढा, अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन!

## दुर्गेश काठोठीवाले (शहरप्रमुख, शिवसेना, जालना) यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सव व श्रावण मासाच्या पार्श्वभूमीवर पाणीवेस ते राजमहल मार्गे लोधी मोहल्ला रस्त्यावरील वीज पोल तात्काळ काढण्यात यावे आणि रस्त्याचे काम त्वरीत सुरू करावे, अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शिवसेना शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी दिला आहे.

जालन्यात आयोजित गणेशोत्सव शांतता कमिटी बैठकीत त्यांनी हा मुद्दा उचलून धरला. पोलिस व महापालिका प्रशासनासमोर मागणी करताना ते म्हणाले, श्रावणात पंचमुखी महादेव मंदिरात भाविकांची गर्दी असते. गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव तोंडावर आहेत. पोल हटवा, रस्ता सुरू करा! या बैठकीला DYSP अनंत कुलकर्णी, PI संदीप भारती, PI बाळासाहेब पवार, PI प्रताप इंगळे, PI संतोष साबळे, MSEBचे सचिन गुलाने, मनपाचे वानखेडे, गणेश सुपारकर, राजेश जागंडे, शिवरतन कर्रे आदींची उपस्थिती.

### शिवसेनेच्या मागण्या

* पोल तत्काळ हटवावेत,
* रस्त्याचे काम लगेच सुरू करावे,
* लाईटच्या वारंवार जाण्याची समस्या सोडवावी,
* गणेश मंडळांसाठी एक खिडकी योजना राबवावी.



# भालेकर कुटूंबाला कपिल आकात यांनी केली आर्थिक मदत



**परतूर । प्रतिनिधी -** शेतात काम करत असताना विजेचा शॉक लागून संदीप रामभाऊ भालेकर यांचे निधन झाले. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे जालना जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी भालेकर कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

कपिल आकात यांनी शोकाकुल कुटुंबियांना आधार देत तातडीची मदत म्हणून रु. २१,००० रु आर्थिक मदत दिली. या कठीण प्रसंगी ते म्हणाले की, शेतकऱ्यांचे आयुष्य किती कठीण आहे हे अशा घटनांमधून वारंवार समोर येते. मृतांच्या कुटुंबाला या दुःखातून सावरण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे ही सामाजिक जबाबदारी आहे.

भालेकर कुटुंबियांसोबत संवाद साधताना आकात यांनी शासनदरबारी योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही दिले. या भेटीप्रसंगी अनेक स्थानिक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये स्व.संदीप यांचे वडील रामभाऊ भालेकर, माजी नगराध्यक्ष विनायक आप्पा काळे, माजी नगरसेवक अंकुशराव तेलगड, विजय राखे, अखिल काजी , सिद्धार्थ बंड, अंकुश भालेकर यांचा समावेश होता.

# पार्सलने तलवारी!

## जालन्यात पोस्टाद्वारे आलेल्या दोन धारदार शस्त्रांची जप्ती; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जाफ्राबाद तालुक्यातील वरुड बुद्रुक येथे पोस्टाच्या पार्सलद्वारे मागवलेल्या २ धारदार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही धडाकेबाज कारवाई केली असून अंकीत प्रभाकर वाघ (वय २७) या इसमाला ताब्यात घेण्यात आले आहे.

रविवार, दिनांक २७ जुलै, रविवार रोजी दुपारी १२ वाजता मिळालेल्या माहितीवरून कारवाई करण्यात आली. अंकीत वाघ याने ऑनलाइन ऑर्डर करून ४००० रुपयांच्या दोन तलवारी पोस्टाद्वारे मागविल्या होत्या. खबऱ्याकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेने तात्काळ हालचाल करत पार्सल जप्त केले आणि आरोपीला अटक केली.

सदर आरोपीविरुद्ध जाफ्राबाद पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोलीस अंमलदार जगदिश बावणे, दिपक घुगे, सागर बाविस्कर, सोपान क्षिरसागर यांनी केली आहे.



### माजी चेअरमन पंडितराव सवने यांचे निधन

**परतूर । प्रतिनिधी -** तालूक्यातील दैठना खुर्द येथील सोसायटीचे माजी चेअरमन पंडित संपतराव सवने यांचे अल्पशा आजाराने दि. २६ जुलै २०२५ रोजी रात्री पावणे अकरा वाजता राहत्या घरी दुःखत निधन झाले. मृत्यू समयी ते ७२ वर्षाचे होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# आगामी निवडणुकींसाठी कार्यकर्त्यांनी ताकदीने तयारीला लागा - तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे

## शिवसेना सक्रिय सदस्य नोंदणी अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मंठा । प्रतिनिधी -** शिवसेना पक्षाच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यभर सक्रिय सदस्य नोंदणी अभियान जोरात सुरू असून, मंठा येथे देखील या उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळत आहे. या अभियानांतर्गत शिवसेनेचे विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचा आणि संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.
जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे,तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना संपर्क कार्यालय येथे रविवार (दि.२७रोजी) सक्रीय सदस्यांची नोंदणी करण्यात आली. एका दिवसात जवळपास पाचशेच्या वर सदस्यांची नोंदणी करण्यात आली.या वेळी बोलताना तालुका प्रमुख बोराडे म्हणाले, शिवसेना हा सामान्य जनतेचा पक्ष आहे. हे अभियान म्हणजे केवळ नोंदणी नव्हे, तर शिवसेनेची विचारधारा जनतेपर्यंत नेण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे.




यावेळी उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, बाळासाहेब देशमुख, अक्षयदीप वाघमारे, विलासराव राठोड, शहर प्रमुख पांडुरंग बोराडे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, अमोल विरकर दत्तात्रय बोराडे राजेश खरात दीपक गायकवाड शुभम गुंड अजय गायकवाड सचिन गायकवाड अजय खंदारे नंदू मामा जाधव महेश देशमुख पंकज देशमुख परमेश्वर वरकड संतोष देवकर माऊली वायाळ संगीता खराबे सविता गवळी मीरा सरकटे भगवान बोराडे बाळासाहेब घोरसड समाधान शेवाळे सुनील गुंड विनोद प्रधान जयदेव चव्हाण शरद काकडे पिराजी पवळे विलास बनसोडे सुनील चव्हाण लिंबाजी बोराडे चांदभाई पठाण शंकर जाधव प्रल्हाद सांगळे शंकर राठोड फिरोज पठाण विष्णू मोरे महेश विधाते आकाश विधाते ऋषी बोराडे आदींची उपस्थिती होती.




# महाराष्ट्र कुस्तीगिर परिषदेच्या अध्यक्षपदी आमदार रोहित पवार बिनविरोध

**पुणे । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेच्या अध्यक्षपदी कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे. विधानसभेचे सलग दुसऱ्यांदा राजकीय मैदान मारल्यानंतर कुस्तीच्या मैदानातही त्यांनी विजयश्री मिळवली आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद ही राज्यातील सर्वांत जुनी संघटना आहे. दोन वर्षांपूर्वी संघटनेची मान्यता आणि राजकारणाच्या घेऱ्यात अडकलेल्या या संघटनेची निवडणूक आणि वैधतेबाबत प्रश्न निर्माण झाले होते. महाराष्ट्र कुस्तीगीर संघ खरा की महाराष्ट्र कुस्तीगिर परिषद वैध याचा वाद थेट कोर्टात पोचला होता. अखेर रविवारी (ता. २७) पुण्यात वारजे येथे महाराष्ट्र कुस्तीगिर परिषदेच्या बोर्डाची निवडणूक झाली. यामध्ये आमदार रोहित पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे.

आमदार रोहित पवार हे महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष म्हणूनही कामकाज पाहत आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी आयपीएलच्या धर्तीवर सलग तीन वेळा एमपीएल यशस्वीपणे भरवून राज्याच्या कानाकोपऱ्यातील क्रिकेट खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. तसेच

> ''कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीतील मैदानी खेळ असून या कुस्तीला पुन्हा एकदा सोन्याचे दिवस आणण्यासाठी आणि राज्यातील गुणी व होतकरु पैलवानांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. आदरणीय पवार साहेबांनी या संघटनेत केलेलं काम माझ्यापुढं दीपस्तंभाप्रमाणे असून यापुढंही आम्हाला सर्वांनाच त्यांचं मार्गदर्शन लाभणार आहे. या निवडणुकीत बिनविरोध निवडून दिल्याबद्दल राज्यातील सर्व जिल्हा संघांचे मनापासून आभार!''
>
> **- रोहित पवार (आमदार, कर्जत-जामखेड)**



गेल्यावर्षी अहिल्यानगर येथे महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या माध्यमातून भरवण्यात आलेल्या 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेत वाद झाल्याने आणि या स्पर्धेच्या एकूणच वैधतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने आमदार रोहित पवार यांनी 'महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेच्या मान्यतेने कर्जत येथे ६६ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा यशस्वीरित्या भरवली होती. आता तर त्यांनी कुस्तीगिर परिषदेच्या संघटनेच्या सर्वोच्च पदावर मजल मारली आहे.

स्व. मामासाहेब मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेची मुहूर्तमेढ रोवली आणि ज्येष्ठ नेते शरद पवार हे गेली चाळीस वर्षे 'महाराष्ट्र कुस्तीगिर परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम करत होते. स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या विचारांनी चालणाऱ्या या संघटनेच्या माध्यमातून राज्यातील अनेक पैलवानांनी आतापर्यंत राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक प्राप्त केला आहे. विविध पदके प्राप्त केलेल्या अनेक गुणवान पैलवानांना शासनामध्ये चांगल्या पदावर नोकऱ्या मिळाल्या आहेत. श्री. शरद पवार यांच्या याचे हेच काम पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आता त्यांचेच नातू आमदार रोहित पवार यांच्यावर आली आहे. क्रिकेटमध्ये त्यांनी ज्याप्रमाणे एमपीएलचा यशस्वी प्रयोग करुन राज्यातील होतकरु क्रिकेट खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले त्याचप्रमाणे आता कुस्तीमध्ये ते कोणता प्रयोग करतात, याकडे राज्याच्या तमाम कुस्ती क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. अनंत बदर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

# जैन विद्यालयाचे प्रश्नमंजुषा स्पर्धेत घवघवीत यश



**जालना । प्रतिनिधी -** येथील श्री म. स्था. जैन माध्यमिक विद्यालय जालना येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक सामान्य रुग्णालय जालना यांच्या वतीने दिनांक २४ /७/ २०२५ रोजी जे एस महाविद्यालय जालना येथे घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषां स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता यामध्ये विद्यालयातील विद्यार्थिनी १) कुमारी.आराध्या विजय कोल्हे २) कुमारी.आरुषी अर्जुन पिसोरे३) कुमारी श्रावणी वैजीनाथ ताठे ४) कुमारी वैष्णवी सर्जेराव डेंगळे यांनी सहभाग नोंदविला होता.

यामध्ये कुमारी आराध्या विजय कोल्हे इयत्ता आठवी हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला असून तिला त्याकरिता १५०० रुपये पारितोषिक मिळाले आहे व तिची मुंबई येथे होणाऱ्या प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. विद्यालयातील दुसरी विद्यार्थिनी कुमारी वैष्णवी सर्जेराव डेंगळे हिने तिसरा क्रमांक पटकाविला असून तिलाही ५०० रुपये पारितोषिक मिळाले आहे व तिचीही मुंबई येथे होणाऱ्या प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी साठी निवड झाली आहे .या सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती कीर्ती बेदमुथा श्री अनिल वाघ यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा .श्री सुदेशकुमारजी सकलेचा सचिव मा.श्री डॉ. धरमचंदजी गादिया संस्थेचे सर्व पदाधिकारी , शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष मा.श्री जितेशजी भायानी उपाध्यक्ष मा.श्री विजयकुमारजी भंडारी शालेय शिक्षण समितीचे सर्व पदाधिकारी , तसेच मुख्याध्यापक श्री एस एम वानगोता पर्यवेक्षक श्रीमती सोमानी , श्री शिंदे डी. एस सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.